# प्राजक्त

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय
'भिडे प्रतिष्ठान'
चे मुखपत्र (खाजगी वितरण)
अंक ८ वा जुलै २०११
त्रैमासिक क्र. ३

Website:www.bhidekul.in
Email:office@bhidekul.in




आम्ही भिडे ७ व्या (त्रैमासिक दुसऱ्या) अंकाचा प्रकाशन समारंभ

*दि. २ एप्रिल रोजी सांगली येथे 'आम्ही भिडे' च्या ७ व्या अंकाचे प्रकाशन करताना सौ. मेधाताई भिडे, डावीकडून श्री. दिलीप, श्री. दामोदर भिडे, श्री.शशिकुमार भिडे, श्री. कुमारकाका (सांगली) व श्री. अमित भिडे.*

## संपादकीय
## 'आम्ही भिडे' ७ व्या अंकाचे प्रकाशन

भिडे परिवाराचे मुखपत्र 'आम्ही भिडे' च्या ७ व्या अंकाचे प्रकाशन, भिडे कार्यालय, सांगली येथे दिनांक २ एप्रिल २०११ रोजी सौ. मेधाताई भिडे (मिरज) यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ सौ. वैशाली भिडे यांच्या गजानन स्तुतीने झाला. त्यानंतर कार्यक्रमाचे संयोजक आणि प्रतिष्ठानचे कार्यकारी सदस्य श्री. कुमार भिडे, सांगली, यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन तिसऱ्या पिढीने म्हणजे तरुण वर्गातील भिडे कुलोत्पन्नांनी केलेले आहे हे विशेष आहे असे सांगितले. त्या प्रमाणे सौ. माधवी, अमित, कु. चैताली, कु. तन्वी, इंद्रनील, हृषिकेश, आरती, अमृता, अमोल, विनीत, प्रणव, नितीन व सौ. अर्चना या भिडे कुलातील तरुणांनी पुणे, मुंबई, सांगली या भागातून प्रकाशनासाठी आलेल्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे म्हणाले की ''वार्षिक संमेलन, प्रकाशन, भिडे भगिनींचा मेळावा, तरुणांची सहल, वार्षिक सभा या कार्यक्रमांच्या माध्यमातून आपण एकत्र येतो, यामुळे मनुष्यबळ वाढते व आपण काही विधायक काम करू शकतो. पुणे, मुंबई प्रमाणे सांगली येथे सुद्धा एक प्रतिष्ठानचे कार्यालय सुरू करण्याचा मानस आहे. या कार्यक्रमाची सर्व जबाबदारी व संयोजन श्री. कुमार भिडे यांनी समर्थपणे केले त्या बद्दल मी त्यांना प्रतिष्ठानचे वतीने धन्यवाद देतो.''

भिडे कुटुंबीय दरवर्षी संमेलन आणि वार्षिक सभेच्या निमित्ताने एकत्र येतात परंतु प्रकाशन किंवा चैत्रागौरी भिडे भगिनींचा मेळावा या निमित्ताने आता आपण वारंवार एकत्र येऊन भेटणार आहोत. आज भारताची फायनल क्रिकेट मॅच असून सुद्धा तरुण वर्गाची जास्तीतजास्त उपस्थिती पाहून आनंद वाटतो. नुकत्याच झालेल्या मुंडाजे येथील भिडे संमेलनात कर्नाटक व्यतिरिक्त २०० पेक्षा अधिक भिडे मंडळी संमेलनाला उपस्थित होती. तसेच मुंडाजे सारख्या छोट्या गावात श्री. नारायण भिडे या तरुण उद्योजकाने उभारलेल्या वीज प्रकल्पाची दखल एका दैनिकाच्या वार्ताहराने घेतली आहे. ही बाब विशेष प्रशंसनीय आहे. पुणे-मुंबईत प्रतिष्ठानचे कार्यक्रम नेहमीच होत असतात, परंतु इतर ठिकाणी सुद्धा ते व्हावेत असे वाटते. आगामी वर्षाचे संमेलन गोवा, नागपूर, इंदूर अशा ठिकाणी व्हावे याकरिता तेथील स्थानिक भिडे मंडळींनी सहाय्य केल्यास दूरवर सुद्धा आपण संमेलन घेऊ शकतो हे मुंडाजे येथील संमेलनावरून दिसून येते. असे प्रतिष्ठानचे श्री. दामोदर भिडे यांनी सांगितले.

श्री. दिलीप भिडे यांनी ७ व्या अंकाबद्दल माहिती दिली. अंकाचे व्यवस्थापन, संपादन, जाहिराती, लेखन, मजकूर व साहित्य या बद्दल विवेचन केले. वेबसाइटवर नोंदणी online करण्यासाठी आवाहन केले. 'आम्ही भिडे' हा अंक विनामूल्य वितरित केला जातो आणि त्या साठी जाहिराती मिळवून प्रतिष्ठानला कोणतीही तोशीस न देता जमा खर्चाचा समतोल राखला जातो. अंक वाचनीय आहे किंवा नाही या बद्दल सूचना, कौतुक, अपेक्षित बदल याबाबत प्रतिक्रिया जरूर पाठवाव्यात. त्यांनी २४ एप्रिल ११ रोजी पुण्यात होणाऱ्या पहिल्या भिडे भगिनी व माहेरवाशिणींच्या चैत्रागौरी महिला मेळाव्याचे निमंत्रण दिले. या कार्यक्रमामध्ये तरुण वर्गाचा म्हणजे तिसऱ्या पिढीचा सहभाग विशेष करून जाणवला. भिडे संमेलनामध्ये सुद्धा अशा तऱ्हेचे नियोजन करण्याचा प्रयत्न केला जाईल. श्री. कुमार भिडे यांनी सांगलीत प्रकाशनाचा कार्यक्रम यशस्वी केला याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

'आपली सून' पुरस्काराच्या पुरस्कर्त्या सौ. मेधाताई भिडे यांनी प्रकाशन केल्यानंतर सांगितले की हा प्रकाशन समारंभ भिड्यांच्या सुनेच्या हस्ते होत आहे हे विशेष आहे. भिडे कुलातील सुनांना अशीच शाबासकीची थाप देऊन कौतुक करणे हाच हेतू 'आपली सून ' पुरस्कार सुरू करण्यामागे आहे. सांगली चित्पावन परिवाराचे अध्यक्ष व पाहुणे श्री. अनिल पोंक्षे यांनी १ मे २०११ रोजी सांगलीत होणाऱ्या चित्पावन परिवाराच्या संमेलनाबद्दल माहिती दिली. श्री. सुनील चिं. भिडे, सांगली, यांनी श्री. कुमार काकांनी या प्रकाशन समारंभाचे आयोजन केल्यामुळे भिडे संमेलनानंतर ७ वर्षांनी सर्व भिडे मंडळींबरोबर एकत्र येण्याचा योग आला. सर्व भिड्यांनी कार्यक्रमाचे निमित्ताने एकत्र येऊन असाच संवाद कायम ठेवावा असे सांगितले. श्री. श्याम भिडे यांनी त्यांचे वधू-वर सूचक केंद्र सांगली येथे असून भिडे कुटुंबियां करिता ही नोंदणी मोफत आहे. त्या बाबतची माहिती **मधुरंग साईटवर** पहावी असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी पुण्यातून मान्यवर श्री. प्रभाकर, प्रदीप, विनायक व ले. क. सुनील भिडे आणि सांगलीतून श्री. वसंत, श्री. रवी, श्री. विश्वासराव, शरदराव भिडे तसेच सौ. पूर्णिमा भिडे हजर होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माधवी भिडे व आभार प्रदर्शन श्री. अमित भिडे यांनी केले. श्री. चंद्रशेखर भिडे, सांगली यांनी 'आम्ही भिडे ' च्या प्रकाशन समारंभासाठी भिडे कार्यालयाची जागा इतर सर्व व्यवस्थेसह विनामूल्य देऊ केली याबद्दल प्रतिष्ठानचे वतीने अमित भिडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सौ. अंजली भिडे यांच्या पसायदानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम संपल्यावर श्री. कुमारकाका व सौ. नीला भिडे, सांगली या उभयतांनी आयोजित केलेल्या भोजनाचा आस्वाद भिडे मंडळींनी घेतला.

❖

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई
(ई – २०१४० (मुंबई) दि. १६ एप्रिल २००२)

## वार्षिक सभेची सूचना

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या सभासदांची **अकरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ९ ऑक्टोबर २०११ रोजी सायंकाळी ४:00 वाजता** खालील ठिकाणी भरेल. सर्व सदस्य भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी सभेला वेळेवर हजर रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय: –

१) स्वागत व प्रास्ताविक
२) दहाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त वाचन व मान्यता
३) वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या हिशोब पत्रकांना मान्यता.
४) सन २०११–२०१२ साठी हिशोब तपासनिसाची नेमणूक
५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे अन्य विषय

**विशेष सूचना : –**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी वरील कामकाजासाठी अर्ध्या तासाने सुरू होईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभासदांना काही प्रस्ताव, सूचना, स्पष्टीकरण इ. आवश्यक असेल तर त्यासंबंधी त्यांनी लेखी स्वरूपात २५ सप्टेंबर २०११ पर्यंत प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयात विचारणा करावी त्यामुळे आवश्यक ती माहिती सभेच्या वेळी तयार ठेवता येईल.

कार्यकारिणीच्या आदेशान्वये
यशवंत भिडे – चिटणीस

**सभेचे ठिकाण : – ''अभिरुची'' भिडे बाग**
**पुणे सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०५१.**

## पुणे/मुंबई व्यतिरिक्त व्यवस्थापन समिती – नांव व संपर्क क्रमांक

१) श्री. नाना भिडे (योजक, रत्नागिरी) ०२३५२–२२२६२५
२) श्री. डॉ. विवेक भिडे (रत्नागिरी) ०२३५७ – २३५२३७
३) श्री. श्रीधर भिडे (मुंडाजे) ०९४४८४५६१८३
४) श्री. नारायण भिडे (मुंडाजे) ०९४४८११२७४७
५) श्री. कुमार भिडे (सांगली) ९८२२०८५३८२
६) श्री. मनोहर भिडे (संगमेश्वर) ०२३५४ – २५२१७२
७) श्री. रवी भिडे (सांगली) ९३७२३२५६७७
८) श्री. अनिल भिडे (माभळे, संगमेश्वर) ९९७५५४६२७२
९) श्री. प्रमोद पु. भिडे (रत्नागिरी) ०२३५२–२२०९५०
१०) श्री. बळवंतराव भिडे (अमळनेर) ९४२०७८७६६५
११) श्री. सुयोग भिडे (गणपतीपुळे) ९८६०७५७३३०
१२) श्री. अमित भिडे (सांगली) ०२३३–२३७५६७७

## श्रद्धांजली

भिडे कुळांतील खालील व्यक्तींना नुकतीच देवाज्ञा झाली. ईश्वर मृतांच्या आत्म्यास सद्गती देवो अशी परमेश्वराकडे प्रार्थना.

१) श्री. भालचंद्र वासुदेव भिडे, पुणे.
२) श्री. रामचंद्र लंबोदर भिडे, तळेगाव (पुणे)


**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

❖ **पुणे कार्यालय** : ९२, शुक्रवार पेठ,
रंजन को.–ऑप. हौसिंग सोसायटी,
मंडई गणपती जवळ,
पुणे – ४११ ००२
फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

❖ **पत्रव्यवहारासाठी पत्ता : विनायक वि. भिडे**
५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ,
भिडे वाडा, पुणे ४११ ०३०. फोन – २४४५३२७४
मोबा : ९५५२२१६९६७


## गुणवंत भिडे आवाहन

भिडे कुलातील बंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी त्यांच्या कलागुणांच्या जोरावर वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष चमकदार कामगिरी करून पुरस्कार, गौरव, मानसन्मान प्राप्त केले असतील अथवा काही उल्लेखनीय व विशेष कामगिरी केली असेल. अशा व्यक्तींची माहिती फोटोसह प्रतिष्ठानकडे पाठवावी. अंकातील जागेनुसार त्याला प्रसिद्धी दिली जाईल. तसेच एखादे चांगले काम असूनसुद्धा त्याला पारितोषिक, पुरस्कार, बक्षीस मिळाले नसेल तरीसुद्धा त्याची दखल घेण्याचे आम्ही ठरविलेले आहे.

कृपया नोंद घ्यावी ही नम्र विनंती !

दामोदर भिडे (डोंबिवली)
९८३३५८७४०१


## संपादक मंडळ

**संपादक** – श्री. शरद ह. भिडे (अंक ८ वा)

**संपादक मंडळ –**
श्री. प्रभाकर भिडे, श्री. दामोदर भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. चिंतामणी भिडे, ले.क. सुनील भिडे, सौ. योगिनी भिडे, श्री. विद्याकर भिडे.

**सल्लागार मंडळ –**
अजय भालचंद्र भिडे, रमेश पु. भिडे, अजय व विजय अनंत भिडे, राजेन्द्र रा. भिडे

**अक्षर जुळणी – श्री. विनायक भिडे (पुणे)**


## मार्च २०११ ते जून २०११ पर्यंतचे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| १) श्रीमती शशीताई घुले (भिडे), पुणे | रु. ५,000/– | देणगी (कॉर्पस) |
| २) श्री. शरद शंकर भिडे, सांगली | रु. ५00/– | देणगी (कॉर्पस) |
| ३) श्री. शाम श्री. भिडे, सांगली | रु. २00/– | देणगी (कॉर्पस) |
| ४) श्री. मिलिंद दिगंबर भिडे, छत्तिसगढ | रु.१0,000/– | देणगी (कॉर्पस) |
| ५) श्रीमती अनघा परशुराम भिडे, पुणे | रु. १00/– | सभासद वर्गणी |
| ६) श्री. वसंत रामकृष्ण भिडे, पुणे | रु. १,00१/– | वाढदिवसानिमित्त |
| ७) सौ. सुषमा शिवराम देशमुख (भिडे), पुणे | रु. १,00१/– | वाढदिवसानिमित्त |
| ८) श्री. आशुतोष दामोदर भिडे, डोंबिवली | रु. १,00१/– | कन्येच्या वाढदिवसानिमित्त |
| ९) श्रीमती मालिनी दिवेकर (भिडे) बडोदा | रु. ५,000/– | देणगी (कॉर्पस) |

# या दानासी, या दानाहून अन्य नसे उपमा

भिडे प्रतिष्ठानची स्थापना होऊन एक तप झाले. कुलवृत्त प्रकाशनानंतरच्या काळात भिडे प्रतिष्ठानला काही वर्षे आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागले. कोणत्याही परिस्थितीत भिडे प्रतिष्ठानची घडी विस्कटता कामा नये या दृष्टिकोनातून विश्वस्त, कार्यकारिणी आणि समस्त भिडे परिवारातील सदस्य भक्कमपणे प्रतिष्ठानच्या पाठीशी उभे राहिले आणि पुन्हा आपण आर्थिक समतोल सांभाळत उभे राहिलो आहोत.

दुसऱ्या कुलवृत्ताच्या प्रकाशन कार्यक्रमांत मा. अध्यक्ष श्री. प्रदीप भिडे यांनी रु. २५ लाखाचा संचित निधी उभा करण्याचा संकल्प केला. या संचित निधीच्या व्याजातून संमेलन व इतर खर्च भागवता येईल असे सांगितले परंतु आजमितीला हा निधी १० लाखापर्यंत सुद्धा पोहोचला नाही अशी खंत भिडे परिवारातील प्रत्येक सदस्याला असणार या बद्दल कोणाचेही दुमत होणार नाही. त्याचप्रमाणे सध्या भिडे प्रतिष्ठानची पुणे आणि ठाणे येथील दोन्ही कार्यालये भाड्याच्या जागेत आहेत. खरंतर १२ वर्षात प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू असावी अशी प्रत्येकाचीच मनोमन इच्छा असणार.

भिडे प्रतिष्ठानची उर्वरित उद्दिष्टे गाठण्यासाठी आपण सर्वजण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत. या आवाहनाद्वारे पुणे किंवा ठाणे, डोंबिवली या परिसरातील आपली जागा प्रतिष्ठानला देऊ केली तर प्रतिष्ठानचे काम करण्यास कार्यकर्त्यांचा उत्साह अधिक द्विगुणित होईल तरी अशा दानशूर व्यक्तींनी प्रतिष्ठानशी संपर्क करावा. ❖

# उद्योगशील भिडे
# के. सी. भिडे, ब्लॉकमेकर्स, पुणे.

'दै. मराठवाडा'चे पत्रकार भारत गजेंद्रगडकर यांच्या 'पथदर्शी' या पुस्तकात 'के. सी. भिडे ब्लॉक मेकिंगचा इतिहास' हा सुंदर लेख वाचल्यावर 'भिडे कुलवृत्ता'त कर्तृत्त्ववान व वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या माहितीत आम्हांला त्यांच्या कार्याची माहिती त्या वेळी न आल्याने समाविष्ट करता आली नाहीं तेव्हा 'आम्ही भिडे' च्या या अंकात ती देत आहोत. श्रीमान के. सी. भिडे हे 'भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्रीमान शशिकुमार भिडे यांचे वडील, त्या मुळे के. सी. भिडे यांच्या कर्तृत्वाचा लेख या अंकात येणे हे औचित्याचेच आहे.

सर्वसाधारणत: ज्या व्यक्तींचे बालपण कष्टात, आर्थिक हलाखीत जाते, ज्यांचे पितृछत्र हरपते त्या व्यक्ती मोठेपणीं महान कर्तृत्व दाखवितात असें दिसते. त्याला केशव चिंतामण भिडे अपवाद नाहीत. केशव चिंतामण यांचे वडील गुजरातेत जामनगरला स्टेशनमास्तर होते. तेथेच १९०९ मध्ये के. सी. भिडे यांचा जन्म झाला. प्लेगच्या साथीत वडील निवर्तले, आईला अंधत्व आले आणि सारे कुटुंबच उध्वस्त झाले. थोरल्या दोन बंधूंपैकी एक कराचीला गेले तर दुसरे पुण्याला शिक्षणासाठी गेले. घरात अंध आई एकटीच. के. सी. भिड्यांचा स्वभाव हूड. जेमतेम इंग्रजी चौथीपर्यंतच शिक्षण, त्यामुळे घरातच मदत करूं लागले. दूध घालणे, भाजी विकणे, जेवणाचे डबे पोचविणें अशी पडेल ती कामे केली.

अशीं कामें करतानाच के. सी. भिडे बालोद्यान प्रेसमध्ये डबा पोचवितांना त्यांना संधी मिळाली. त्या प्रेसमधील ब्लॉक प्रोसेसिंगचे काम हे केवळ शिकण्यासाठी उमेदवारी करूं लागले. या छोट्या ओळखींतून शिकण्याच्या बोलीवर के. सी. ऊर्फ दादा १९२९ मध्ये प्रोसेसिंग करू लागले. ज्या ब्लॉकला मालकाला विक्रीतून साडे तीन रुपये मिळतात त्याचा उत्पादन खर्च एक रुपयाच असतो हे त्यांच्या लक्षात आले. एक मनुष्य दिवसभरात ४–५ ब्लॉक करीत असे. ही विद्या त्यांनी बालोद्यानमध्ये आत्मसात केली. पुढे पुण्यातच चित्रशाळा प्रेसमध्ये त्यांनी कमी पगाराची ब्लॉक मेकिंग खात्यात नोकरी घेतली. पगार केवळ रु. १५/– पण शिकण्याची जिद्द होती. त्या वेळी एस्. टी. बस नव्हत्या. दातार नांवाचे गृहस्थ दोन प्रवासी गाड्या चालवीत असत. त्यांच्याकडे दादांनी कंडक्टरची नोकरी धरली. पुढे एक वर्षभर भाड्याने गाडी घेऊन चालविली. त्यांतून हजार रुपये मिळाले. त्या पैशातून एक कॅमेरा घेतला. गाडीतून प्रवास करतांना वेगवेगळे फोटो घेता घेता छायाचित्रण कला आत्मसात केली. पण त्यांना प्रोसेसिंगचे काम करायचें होते. धाडसानेच लंडनच्या एका कंपनीला प्रोसेसिंग कॅमेऱ्याची ऑर्डर दिली.

पुण्यात त्यावेळी टांगे चालायचे. टांगा चालकाला परवाना लागे, त्यावर त्याचें छायाचित्र लागे. दादांनी टांगेवाल्यांची छायाचित्रे घेऊन बरेच पैसे मिळविले. २३ जुलै १९३२ ला त्यांनी स्वत:च्या कॅमेऱ्याने पहिला ब्लॉक बनविला. वयाच्या बाविसाव्या वर्षी अशा रीतीने ब्लॉक मेकिंगचा व्यवसाय जिद्दीने प्रारंभ केला. त्या काळी कसलीच यंत्रे नव्हती. सर्व कामे हातांने करावी लागत. सायकलच्या दिव्याला लाल कागद लावून तो डार्क रूम मध्ये वापरला. कामाचा व्याप हळूहळू वाढला. प्रथम प्रथम मासिक शंभर रुपये प्राप्ति होती. त्या काळच्या स्वस्ताईत ही रक्कम बरीच होती. कामाच्या जागी स्वत:ला बसण्यास एक आणि ग्राहकाला एक अशी दोनच पोती असा दुकानाचा थाट ! त्या वेळी आपटे नांवाच्या गृहस्थांनी दादांसाठी एक मुलगी आणली आणि दादांचा विवाह झाला.

दिवसांप्रमाणेच माणसेही बदलतात. स्वतंत्र व्यावसायिक दादांशी जी माणसे बोलत नसत तीच आपणहोऊन हात जोडून बोलू लागली. दीर्घोद्योगी दादांनी ब्लॉक मेकिंगमध्ये पराक्रम केला. स्वत: स्क्रीन बनविले, अद्ययावत यंत्रे विकत आणून स्वत: चालविली. राऊटिंग मशीन सर्वप्रथम याच मराठी माणसाने आणले. त्यांच्या कारखान्यातील विविध यंत्रे त्यांनी स्वत: चालविली व कामगारांना शिकविली. स्वत:च पुस्तके वाचून तंत्र आत्मसात केले. युद्ध काळात ब्लॉकसाठी जस्त (झिंक) लागे ते मिळत नसे तेव्हा दादांनी जुन्याच प्लेट उपयोगात आणल्या आणि कठिण प्रसंगातून मार्ग काढला.

माणसावर अनाहूतपणे संकटे येतातच. १९४० मध्ये डोळे आल्याचे निमित्त झाले. दादांना दिसेनासे झाले. त्या वेळी अँटिबायोटिक नव्हती. तीन वर्षे दुखण्यात गेली. एकदा कॉन्सन्ट्रेटेड सिल्व्हर नायट्रेट डोळ्यात घातले आणि काय आश्चर्य ! अंधुक अंधुक दिसूं लागले. नंतर कालांतराने डोळे बरे झाले. दादांनी १९५५ मध्ये पुण्यात माडीवाले कॉलनीत घर घेतले. १९६५ ला तेथे कारखाना हलविला.

कामाचा व्याप वाढला तशी नवीन यंत्रसामुग्री जुन्याच्या जागी आणली. मॅट नावाचे ब्लॉकच्या प्रती करण्याचे यंत्र स्वत: आरेखन करून बनविले व बरीच वर्षे वापरले. नंतर इलेक्ट्रॉनिक कॅमेरा आणून जे काम इतरांकडे पंचवीस लाखांच्या यंत्रावर होत असे तेंच काम स्वत:च शिकून सुबकपणे करून दिले. बदलत्या काळानुरूप बदल करत करत सुधारणा करून त्यांनी यशाच्या पायऱ्या चढत उंची गाठली. मला तर डार्विनच्या तत्वाची आठवण झाली.

त्यांनी पडेल ते काम करण्याची सिद्धता ठेवली. तेच वळण मुलांना लावले. मोठा शशिकुमार सहाय्याला आला. इलेक्ट्रिकल् इंजिनियर रवि बेंगळूरची नोकरी सोडून आला. तिसरा प्रकाश जी. सी. डी. झाला अन् स्वत:चा प्रिंटिंग प्रेस उभा केला. नातू दिपकने कारखान्यातील कठीण कामाचे आव्हान स्वीकारून ते यशस्वी केले.

शून्यातून एवढी मार्गक्रमणा केलेले दादा कृतार्थ झाले. पर्वती जवळच्या बंगल्यातून राहवत नाही म्हणून चालत कारखान्यात येत असत. महाराष्ट्रात भिडे ब्लॉक मेकर्स हे नांव प्रसिद्ध झाले.

आतां तिसऱ्या पिढीतील कर्तृत्वसंपन्न नातवंडे आजोबांचा व्यवसाय उत्साहात चालवत आहेत.

माणसालातरी आणखी काय हवें ?

प्रभाकर भिडे, ठाणे.

दूरभाष – ९५२५१–२४४३६४२❖

## भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

| जुलै | दि. |
|---|---|
| १) श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी – | २ |
| २) सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई – – | १६ |
| ३) श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली – | १७ |
| ४) श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल | २० |
| ५) श्री. विनायक व्ही. भिडे, डोंबिवली – | २१ |
| ६) सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा – | २२ |
| ७) कु. दीपांकिता सुनील भिडे, पुणे – | २३ |
| ८) श्री. विनय विष्णु भिडे, पुणे – – – | २४ |
| ९) सौ. स्मिता सतीष भिडे, मुंबई – | २७ |
| १०) श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे – – – | २८ |
| ११) सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज – – | ३० |

| ऑगस्ट | दि. |
|---|---|
| १) श्री. विद्याकर वासुदेव भिडे, पुणे – – | ५ |
| २) कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा – – – | ६ |
| ३) श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे – | ६ |
| ४) सौ. योगिनी माधव भिडे, पुणे – – – | ७ |
| ५) चि. ओंकार मिलिंद भिडे, पुणे – – – | १० |
| ६) सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई – – | ११ |
| ७) श्री. अमित दिलीप भिडे, पुणे – – – | १२ |
| ८) सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे – – | १४ |
| ९) कु. ऋता चिंतामणी भिडे, ठाणे – – | १५ |
| १०) ले. कर्नल सुनील वासुदेव भिडे, (नि.) पुणे | १५ |
| ११) श्री. मिलिंद पुरुषोत्तम भिडे, पुणे– – – | १८ |
| १२) श्री. नीलकंठ लक्ष्मण भिडे, पुणे – – | २० |
| १३) सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली – – | २१ |
| १४) श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे – – | २१ |
| १५) सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे – – | २२ |
| १६) श्री. नीलेश अशोक भिडे, पनवेल – | २६ |
| १७) श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली – – | २६ |
| १८) सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे – – | ३० |
| १९) श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर | ३१ |
| २०) श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम – – | ३१ |

| सप्टेंबर | दि. |
|---|---|
| १) कु. सूरश्री राजेन्द्र भिडे, डोंबिवली – | १ |
| २) श्री. केदार प्रभाकर भिडे, डोबिवली – | २ |
| ३) श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे – – – | ३ |
| ४) श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे – – | ७ |
| ५) सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर – | ९ |
| ६) श्री. अमित अरविंद भिडे, पुणे – | १० |
| ७) कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे – – | १० |
| ८) श्री. पुरुषोत्तम शंकर भिडे, पुणे – – – | १० |
| ९) श्री. अनंत शरद भिडे, चिपळूण – – | १२ |
| १०) श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा – – | १३ |
| ११) सौ. सुहासिनी पुरुषोत्तम भिडे, पुणे – – | १३ |
| १२) श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण – | १५ |
| १३) सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे – – | १८ |
| १४) कु. प्रसाद केदार भिडे, डोबिवली – | १८ |
| १५) श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे – | १८ |
| १६) सौ. रेणुका केदार भिडे, पुणे – – – | २२ |
| १७) सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा – | २९ |

### सूचना

'आम्ही भिडे' च्या ऑक्टोबर–डिसेंबर महिन्याच्या अंकाचा प्रकाशन समारंभ दिनांक ९ ऑक्टोबर २०११ रोजी सायंकाळी होणाऱ्या वार्षिक सभेच्या कार्यक्रमात श्री. नीलकंठ लक्ष्मण भिडे, सूर्यशिबीर – पुणे यांचे हस्ते होईल. कार्यक्रमाचे ठिकाण 'अभिरुची ' भिडे बाग, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०५१.

## शिष्यवृत्ती

चित्पावन फाऊंडेशन तर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्या खाली दिलेल्या आहेत, चित्पावन विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

१) उच्च शिक्षणासाठी आर्थिक दृष्ट्या गरजू चित्पावन विद्यार्थ्यांना दरवर्षी ५०,०००/– रुपयांची बिनव्याजी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. संबंधितांनी आपले अर्ज खालील पत्त्यावर पाठवावेत.

**श्री. धनंजय आर. बर्वे**
पांडुरंग निवास, ३५ गिरिजा हौसिंग सोसायटी पौड रोड, कोथरूड, पुणे – ४११ ०३८.

२) १२ वी परीक्षेत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ५ चित्पावन विद्यार्थ्यांना अनुक्रमे १) रु. १ लाख २) रु. ७५,०००/– ३) रु. ५०,०००/– ४) रु. २१,०००/– ५) रु. ११,०००/– असे पुरस्कार देण्यात येणार आहेत. २०११ मध्ये १२ वीत उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी खालील पत्त्यावर अर्ज करावेत, अर्जासोबत गुणपत्रिकांची प्रमाणित प्रत, पत्ता व फोटो आवश्यक आहे.

**संपर्काचा पत्ता : – श्री. अजय दाते**
४०१, ग्रेस अपार्टमेंट, कॉस्मोपॉलिटन सोसायटी, आय. टी. आय. रोड, औंध, पुणे – ४११ ००७. मोबाईल क्र. ९८२३४५२१२१

**अंतिम मुदत – ५ ऑगस्ट २०११**
**अधिक माहिती करिता संपर्क**
**श्री. अशोक वझे – ९८८१७२४३७३**


FINANCIAL SERVICES, LONG TERM FINANCE
WORKING CAPITAL FINANCE
COST MANAGEMENT, PROFIT IMPROVEMENT
**INVESTMENT SERVICES**
FAMILY BUDGET MANAGEMENT AND FINANCIAL PLANNING,
AGRICULTURAL LAND AND FARM HOUSES,
REAL ESTATE COMMODITIES,
MUTUAL FUNDS, POSTAL SAVINGS, P. P. F., CAPITAL GAINS BOND,
LIFE AND GENERAL INSURANCE, FIXED DEPOSITS,
TRADING IN AND IPO's OF SHARES, BONDS/DEBENTURES

**BOMBAY FINANCE & INVESTOR GROUP**
A-9, FLAT No. 303, SAKET COMPLEX, MAJIWADE, THANE - 400 601
TEL. : 2538 5461. e-mail : bomfinvest@yahoo.com

# भिडे भगिनी व माहेरवाशिणींचा
# चैत्रागौरी मेळावा

दि. २४ एप्रिल २०११ रोजी सायंकाळी भिडे प्रतिष्ठानतर्फे भिडे भगिनी व माहेरवाशिणींचा ''चैत्रा गौरी '' महिला मेळावा आनंद मंगल कार्यालय, पुणे येथे संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात अन्नपूर्णा देवीची ओटी भरून व आरती करून झाली. श्रीमती शशीताई घुले यांनी चैत्रागौरीचे महत्त्व विशद केले. चैत्र मास म्हणजे सणांची सुरुवात, पर्यावरण, तसेच भाजीपाला, फळे-फुले, चंदन, वाळा, आंब्याची कैरी यांचे चैत्रातील गौरींच्या अनुषंगाने महत्त्व काय आहे ते स्पष्ट केले. तसेच चैत्र महिन्यामध्ये हळदी-कुंकू इ. समारंभाच्या माध्यमातून गृहिणींनी एकत्र येऊन एकमेकींशी संवाद साधणे हा खरा या मागील हेतू असल्याचे सांगितले. सौ. योगिनी, सौ. प्रिया आणि प्रतिभा भिडे यांनी अन्नपूर्णा देवीच्या स्तोत्राचे वाचन केले. सौ. मेधा भिडे यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुरस्कृत केलेल्या ''आपली सून '' पुरस्काराबाबत मनोगत व्यक्त केले. त्यानंतर एकेका भगिनीने सर्वांसमोर उभे राहून आपापली ओळख करून दिली. व्यक्तिगत ओळख, व्यवसाय, विशेष आवड अथवा छंद अशा स्वरूपाचे स्वत:चे मनोगत अशा स्वरूपाची ही ओळख होती. यातून आपल्या भिडे भगिनी किती निरनिराळ्या प्रकारच्या कामामध्ये अथवा व्यवसायमध्ये कार्यरत आहेत याचे समग्र दर्शन झाले. त्यानंतर सर्वांनी आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे आणि ओल्या नारळाची करंजी यांचा आस्वाद घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली. मुसळधार पावसातही भिडे भगिनी व माहेरवाशिणींनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावली हे विशेष होय.

कार्यक्रमाच्या संयोजनामध्ये सौ. जयश्री भिडे, व श्रीमती शशीताई घुले (भिडे) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सौ. प्रिया, सौ. योगिनी, सौ. वर्षा तसेच सौ. माया, सौ. रोहिणी व प्रतिभाताई भिडे आणि सौ. शर्मिला करंदीकर (भिडे), सौ. सोमण यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

सर्व महिलांनी एकत्र येण्यासाठी भिडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून अशा कार्यक्रमांचे नेहमी आयोजन व्हावे असाही सूर कानी आला.

**शब्दांकन**
**श्रीमती शशि घुले (भिडे), सौ. प्रिया भिडे (पुणे)**

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे नव्याने सुरू झालेला

## 'आपली सून ' विशेष गौरव पुरस्कार, पुरस्कर्त्यांचे मनोगत

माझ्या मनातली 'आपली सून ' ही अचानक सुचलेली कल्पना नाही. निमित्त 'आम्ही भिडे ' मुखपत्रातील बक्षिसांच्या यादीचे. अनेक जणांनी वेगवेगळ्या खेळांसाठी, कलागुणांसाठी बक्षिसे ठेवलेली वाचली आणि माझ्या मनात दडलेली सून प्रत्यक्षात उतरली. कुमारकाकांच्या मार्गदर्शनाखाली ही औपचारिकता पूर्ण केली. पण ही सून काही अचानक सुचलेली नाही. आजपर्यंतच्या आयुष्यात अनुभवायला मिळालेल्या असंख्य सुनांच्या रूपानं ती आत नांदत होती. या संकल्पनेची मुळं आपल्या संस्कारातच रुजली आहेत आणि बहुतेक महिलांच्या मनात ती आहेतच. मी फक्त प्रत्यक्षात साकारली.

''बहरला पारिजात दारी, फुले का पडती शेजारी . . .'' तसंच आपलं मुलींचं असतं. बालपणापासूनच 'तू या घरची नाहीस, उद्या तू तुझ्या घरी म्हणजे सासरी जाणार ' हा साक्षीभाव रुजवलेला असतो. आशी परक्या घरची समजली जाणारी ही पोर इथे सासरी कर्तव्यदक्ष असते. ''लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते'' या बहिणाबाईंच्या शब्दांची साक्ष पटते. या सुनेमुळेच संस्कारांचा वारसा पिढी दर पिढी पुढे सरकत राहतो. साऱ्या घराला ती एका गोड बंधनात एकत्रित करून ठेवते. या सुनेला ह्या घराबद्दल, या माणसांबद्दल आपुलकी वाटणं महत्त्वाचं. तद्वतच आलेल्या सुनेला आपलीशी करून घेणं, हे कुटुंबाचं कौशल्य आहे. तिच्या पाठीवर शाबासकीची एक थाप, कौतुकाचा एक शब्द, कर्तृत्वाला दाद देणं आणि छोट्या-छोट्या त्रुटी पोटात घालून मनाचा मोठेपणा दाखवणं हे कुटुंबाचं कर्तव्य आहे. आलेल्या मुलीला हे घर, ही माणसं आपली वाटावी असं वातावरण देणं हे महत्त्वाचं आहे.

प्रेमाचा एक शब्द पुरेसा असतो. याचं साधं उदाहरण घ्या, सणावाराचा स्वयंपाक करून, जेवणं उरकून मागचं आवरून मग जरा आडवं व्हावं का, म्हणून घड्याळात बघते तोपर्यंत ३ वाजलेले असतात. चहाची वेळ झालीच असते. पण तेवढ्यात कुणी कौतुकानं म्हणालं, ''बस जरा आता, पहाटे पासून तुझी खूप धावपळ झालीय. चहा जरावेळानं केलास तरी चालेल.'' या चार शब्दानंच तिला केवढं बळ येतं. क्षणाचीही उसंत न लावता चहापाणी आवरून मगच ती माउली बसते. या ऐवजी आतून तिरका स्वर आला तर मनाची काय स्थिती होईल ? नुसती कल्पना करा.

म्हणून ज्या घरी असा आनंद, समाधान नाही तिथे आत्मपरिक्षणाची गरज आहे. प्रत्येकाने आपल्या मनाला, ''आपण कुठे कमी पडतो ?'' येवढे विचारा, बस् !

मला काही उदाहरणं आवर्जून सांगावी वाटतात, माझे आजी-आजोबा तिघी सुनांशी अगदी मुलींप्रमाणे वागत. काही कार्यक्रम असेल तर स्वयंपाकाला सुरुवात करण्याआधी आजी विचारायची, अगं कुंदा, जयश्री, सुधा काही खाल्लंत की नाही ? आधी घास-घास खाऊन घ्या, मग लागा कामाला. हक्कानं समजावणं चुकलंसं वाटलं तर लगेच निदर्शनास आणून देणं, आणि वेळप्रसंगी चुका पोटात घालणं आणि आई वडिलां इतकीच माया करणं, आज आजी-आजोबांमुळं घरातलं घरपण आणि एकी ५ पिढ्या झाल्या तरी टिकून आहे. एक सून म्हणून आणि सासू म्हणून आजीच्या भूमिकेतून खूप शिकायला मिळालं. मला एक प्रसंग आठवतो, २०-२१ वर्षा पूर्वीची गोष्ट आहे. बहीण व मी मिरजला सुट्टीत आईकडे आलो होतो. वडिलांनी आम्हा दोघींना साडीला १००,१०० रुपये दिले. त्यांना म्हटलं अहो १०० रुपयात साडी नाही येणार १५०,१५० द्या. दुपारी दुकानला जाताना त्यांनी आईकडे ३०० रु. दिले. संध्याकाळी बाजारात जाताना आईने आमच्या हातावर १००,१०० रु. ठेवले व १०० रु. वहिनीच्या हातावर ठेवले. म्हणाली जे आणायचं असेल ते तिघींना एकसारखे आणा. त्या क्षणी खरं तर आईचा मनोमन राग सुद्धा आला होता पण सुनेला आपलंसं करणं म्हणजे काय हे तिच्या आचरणातून शिकायला मिळालं.

*पुढील मजकूर पान क्र. ६ वर*

*पान क्र. ६ वरून पुढे चालू . . . 'आपली सून' मनोगत*

मागच्या वर्षी माझ्या नातीचं 'सीया' चं बारसं झालं. तेव्हा माझ्या आजीचा प्रपौत्र दर्शन चा कार्यक्रम केला. माझ्या आईची आई ८५ वर्षांची आहे. तिची सिया ही खापर पणती. तिच्या कडून संस्कारांचा वारसा ५ पिढ्या पोहोचविला गेला. माझ्या दृष्टीने माझी आजी ही आदर्श सून आहे. ''आपली सून '' पुरस्कार मी मनोमन तिलाच दिलाय. ती माझ्या आईची सावत्र आई, माझी सावत्र आजी. तिच्या सावत्रपणाचा उल्लेख मी माझ्या ४३ वर्षांच्या आयुष्यात प्रथमच करतेय. म्हणून मनापासून तिची माफी मागते. पण मला तिच्या सावत्रपणाचाही खूप अभिमान आहे. आई, मामा, मावशी यातिन्ही मुलांचं तिनं स्वत:ची मुलं मानून सारं केलं. आई व मावशीनी स्वत:ला नातवंडं झाली तरी माहेरपण छान उपभोगलं. आजीनी या मुलांचं केलंच, पण स्वत:च्या भावंडांच्या मुलांचं, शेजारपाजारच्यांचं, सासरच्या सगळ्यांचं केलं. पण विशेष म्हणजे सवतीच्या वडिलांचे, सवतीच्या भावंडांचेही तितकेच प्रेमाने केले. मला परवा-परवा कळलेली गोष्ट म्हणजे पहिल्या आजीच्या बहिणीने तिच्या वडिलांना सांगितलं ही बाई बाळंतपण करणार असेल तर मी बाळंतपणाला माहेरी येणार आणि माझ्या या आजीने सवतीच्या बहिणीचे बाळंतपणही केले.

मी कधीही आडिवरेला देवीला जाणार असे तेव्हा आजी मला म्हणायची तू जाशील तेव्हा सांग मलाही यायचेय अडीवऱ्याला. दोनदा अडिवऱ्याला गेल्यावर सहज


***'आपली सून' मनोगत पान नं. ८ वर पुढे चालू . . .***


BootStrap Today

*Best Wishes from*
**Nitin Bhide**

## "Online Project Collaboration Software"

Working together on projects has never been so easy ....now it is




www.BootStrapToday.com




## BootStrapToday Features

- Multiple Projects
- User & Project Dashboard
- Ticket Management
- Milestones
- Project Charts
- Time Tracking
- Document & Code Management
- Calendar
- Wall
- Activity Stream
- SSL

**Software Powered by: Sensible Softwares Pvt Ltd | email: info@sensiblesoftwares.com**

**१० वी आणि १२ वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !**

***विद्यार्थी गुणगौरव, पुरस्कार आणि ज्येष्ठांचे सत्कार याबाबत निवेदन दि. २५ डिसेंबर २०११ रोजी होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात दर वर्षीप्रमाणे गुणगौरव/ज्येष्ठांचा सत्कार आणि पुरस्कार समारंभ संपन्न होणार आहे. खाली दिलेल्या गटातील निकषांनुसार माहिती ३० सप्टेंबर २०११ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावी.***

**सौ. धनश्री श्रीनिवास भिडे** (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना)

३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०३०. दूरध्वनी - ९५२०-२४३३७४५५

**विशेष सूचना -**

<u>१) विद्यार्थी गुणगौरव योजनेचा फॉर्म डिसेंबर २००९ च्या अंक ४ मध्ये दिलेला आहे.</u> त्याची झेरॉक्स प्रत उपयोगात आणली तरी चालेल किंवा www.bhidekul.in या आपल्या वेबसाइटवरून तो फॉर्म डाउनलोड करून घ्यावा.

२) अपूर्ण तसेच वरील तारखेनंतर आलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही.

३) एका पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची माहिती पाठवायची असल्यास या फॉर्मची झेरॉक्स प्रत उपयोगात आणावी.

४)पारितोषिकासाठी/पुरस्कारासाठी/सत्कारासाठी निवड झालेल्यांना पत्राने किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क करून कळविले जाईल. त्या करिता आपला संपर्क क्रमांक देणे आवश्यक आहे.

५) पुरस्कारासाठी आपले नामांकन गटानुसार दिलेल्या निकषांप्रमाणे पाठवावे आणि त्या संबंधीच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

६) जेष्ठांच्या सत्काराकरिता आपले नांव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, व्यवसाय/नोकरी, सामाजिक कार्य व उल्लेखनीय कामगिरी, पारितोषिके इत्यादी माहिती कोऱ्या कागदावर शक्य असल्यास आयकार्ड फोटोसह लिहून पाठवावी.

७) माहिती पाठविणाऱ्यांकडून आयकार्ड साइज फोटो अपेक्षित आहे. शक्य असल्यास पाठविणे.

८) विद्यार्थी गुणगौरव योजनेच्या गटातील निकषांनुसार २०१०-२०११ या वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींनीच सुवाच्य अक्षरात माहिती पाठवावी.

<u>**गट पहिला**</u> - ४थी व ७वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

<u>**गट दुसरा**</u> - ५ वी ते ९वी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यात प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.

<u>**गट तिसरा**</u> - दहावीच्या शालांत परीक्षेत ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालान्त परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

<u>**गट चौथा**</u> - १० वी च्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालान्त परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक) (श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई. कै. श्रीपाद सखाराम भिडे, यांचे स्मरणार्थ

<u>**गट पाचवा**</u> - १२ वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली
(कै. के. वि. तथा दादूकाका भिडे, सांगली, यांचे स्मरणार्थ)

<u>**गट सहावा**</u> - १२ वी च्या परीक्षेत शास्त्र शाखेत ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे कला शाखेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे आणि वाणिज्य शाखेत ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक)

<u>**गट सातवा**</u> - १० वी च्या शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी.
श्री बळवंत दत्तात्रय भिडे, अमळनेर (कै. सिंधू विनायक भिडे, यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

<u>**गट आठवा**</u> - १० वी च्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई, पुरस्कृत (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

<u>**गट नववा**</u> - १० वी च्या शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थि/विद्यार्थिनी. (सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत), त्यांचे वडील, (कै. दत्तात्रय विनायक भिडे, अमळनेर यांचे स्मरणार्थ)
(शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

<u>**गट दहावा**</u> - संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व आणि क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी. सदर प्राविण्य कुठल्या स्तरावर मिळविले आहे, याची माहिती व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

<u>**गट अकरावा**</u> - विशेष पारितोषिक कै. श्रीकृष्ण भिडे यांच्या स्मृति प्रीत्यर्थ ''साहस/क्रीडा पुरस्कार. या गटात ज्यांना अर्ज करावयाचे असतील त्यांनी आपले नांव, शिक्षण, कौटुंबिक माहिती आणि साहस/क्रीडा प्रकार याची माहिती वेगळ्या कागदावर सुवाच्य हस्ताक्षरात लिहून पाठवावी. या संदर्भात त्यांना मिळालेल्या प्रशस्तिपत्रक/पारितोषिक प्रमाणपत्राची एक सत्यप्रत समवेत जोडावी. श्री. रा. म. भिडे, पुणे (कै. श्रीकृष्ण भिडे स्मृति प्रतिष्ठानचे कै. श्रीकृष्ण भिडे यांचे स्मृति प्रीत्यर्थ)

<u>**गट बारावा**</u> - संगीत, नाट्य, चित्रपट क्षेत्रात खास कामगिरी करणारी खास भिडे व्यक्ती. (श्री. कुमार आणि वसंत विष्णु भिडे, सांगली. यांचे बंधू कै. सुभाष विष्णु भिडे, यांचे स्मरणार्थ)

<u>**गट तेरावा**</u> - सौ. मेधा ऊर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत **''आपली सून''** विशेष गौरव पुरस्कार, भिडे कुलातील कुणाचीही पत्नी, आई, अथवा सून यापैकी कुणीही. या पुरस्कारासाठी असलेले निकष खालीलप्रमाणे :- १) सुसंस्कारांचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य सातत्याने करणारी २) विशेष प्राविण्य किंवा विशेष पारितोषिक मिळालेली ३) समाज कार्यात अग्रेसर असणारी ४) अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी ५) लेखन करणारी ६) प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी विशेष धडपड करणारी. वरीलपैकी कोणत्याही एक वा अनेक प्रकारे कार्य यशस्वीपणे करणाऱ्या स्त्री चे नामांकन, आई, पत्नी वा सुनेच्या गौरवासाठी घरातील पुरुष मंडळींनी पुढाकार घेऊन प्रतिष्ठानकडे आपणहून नाव सुचवावे.

<u>**गट चौदावा**</u> - विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना : इरावती ट्रस्ट, दादर मुंबई यांच्या प्रमुख श्रीमती सुमित्र मधुसूदन भिडे यांनी कै. त्रिंबक राजेश्वर भिडे आणि कै. जानकीबाई त्रिंबक भिडे यांचे स्मरणार्थ पुरस्कृत केलेली विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना खालीलप्रमाणे . . .
आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीत असणाऱ्या कोणत्याही गुणवान, अभियांत्रिकी किंवा आर्किटेक्ट शाखेत शिक्षण घेत असलेल्या, भिडे कुलातील विद्यार्थी/विद्यार्थिनीला दरवर्षी सहाय्य देण्यासाठी पारितोषिक /मदतीची योजना आहे.

**❖ ७५ वर्षे किंवा त्यावरील सत्कारार्थी ज्येष्ठ कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी फोटोसह माहिती पाठवावी ❖**

*'आपली सून' पान नं. ६ वरून पुढे चालू . . .*

विचारलं, तुला अडिवऱ्याला येण्याची इतकी आवड का ? तर म्हणाली हल्लीच कळालं होतं पहिल्या ताईच्या माहेरचीपण तीच देवी आहे. म्हणून साडी नेसवायचं मनात होतं. हे ऐकून तर मी अवाकच झाले.

या आलेल्या सुनेला आपलंसं करून घेणाऱ्या घरच्या वडीलधाऱ्यांना शतश: प्रणाम !

अशा कितीतरी सुना जवळून पाहिल्यात. ते आपलेपण सर्व सुनांना मिळावं. घरातला आनंद, समाधान, घराचं घरपण या आपलेपणात दडलेलं असतं. म्हणून आपलंसं करून घेणं किती महत्त्वाचं आहे. हे असं खूप खोलवर कधीपासूनचंच मनात होतं. म्हणून हा विशेष गौरव पुरस्कार जाहीर करताना विशेष आनंद वाटला.

सर्व सुनांना आणि कुटुंबीयांना माझे मनापासून नमस्कार !

***सौ. मेधा अविनाश भिडे, मिरज – सांगली*** ❖

## अभिनंदन

चि. अथर्व विवेक भिडे, सड्ये पिरंदवणे, जि. रत्नागिरी. याने चौथीच्या स्कॉलरशिप परीक्षेत ३०० पैकी २९४ गुण मिळवून महाराष्ट्रात तिसरे आणि रत्नागिरी जिल्ह्यात पहिले स्थान मिळविले. त्याच्या घवघवीत यशाबद्दल समस्त भिडे परिवारातर्फे त्याचे अभिनंदन !



# भिडे कुलसंमेलन

महाराष्ट्र चित्पावन संघ पुणे व चित्पावन फाऊंडेशन आयोजित

**"आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन"**

**चंद्रशेखर आगाशे कॉलेज, गुलटेकडी - पुणे,** येथे २१ ते २५ डिसेंबर २०११ या कालावधीत संपन्न होत आहे. या प्रदर्शनाचे निमित्ताने महाराष्ट्र चित्पावन संघ यांनी प्रत्येक कुलाला केलेल्या आवाहनानुसार बऱ्याच कुलांची संमेलने पुण्यात होत आहेत. त्यानुसार **'भिडे कुल संमेलन'** सुद्धा **रविवार दि. २५ डिसेंबर २०११** रोजी, **पुणे** येथे करण्याचे ठरविले आहे. या संमेलनाचे ठिकाण, वर्गणी व नियोजन इत्यादी बाबत माहिती भिडे वेबसाइट, 'आम्ही भिडे' अंक अथवा इतर संपर्क माध्यमातून लवकरच प्रसारित करीत आहोत. या संबंधी आपल्याकडून येणाऱ्या सूचना स्वागतार्ह आहेत आणि आपला सहभागही अपेक्षित आहे. तरी कृपया संपर्कात रहावे.

*नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान*



## निवेदन

महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे यांच्या सहकार्याने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान कार्यालयाची पुणे येथे दुसरी शाखा सुरू करण्यात आली आहे. गुरुवार दि. २३ जून २०११ रोजी श्री. शिवछत्रपती पुरस्कार विजेती कु. मानसी भिडे हिचे हस्ते संध्याकाळी या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांचेसह मान्यवर भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणी हजर होत्या. तसेच महाराष्ट्र चित्पावन संघाचे पदाधिकारी सर्वश्री भाटे, साने, दिवेकर, भागवत उपस्थित होते. टेबलस्पेस तत्वावर इतर कुलांनीसुद्धा या जागेचा उपयोग करून घ्यावा असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले. दर गुरुवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळात आपले कार्यकर्ते तेथे भेटतील. **संपर्कासाठी पत्ता** – महाराष्ट्र चित्पावन संघ, १२०८ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे – ४११ ०३०. फोन : दिलीप भिडे, ९६५७५४१२३६




# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : 5 to 10 H.P.
Output Capacity : 500 Kg / hr.
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : 15 to 20 H.P.
Output Capacity : 1 Tonn / hr.
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : 25 to 30 H.P.
Output Capacity : 3 Tonn / hr.
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : 2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.
Output Capacity : 200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



IBR & Non IBR Piston Valve
Class 150, Class 300 & PN 40
Size 15 mm to 150 mm

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**




Pressure - From 30 kg/cm$^2$ to 300 kg/cm$^2$
Application - Chemical Injection, Cleaning
Drainage Pipes, Boiler feed etc.

**CASTINGS**



Heavy C.I. Castings
Maximum single piece -
2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton

## एक गुणवंत महिला

# डॉ. सौ. सौदामिनी सुनील भिडे (गोडबोले)



मुलगी सासरी येताना आपल्याकडे असलेली बुद्धिमत्ता व कौशल्य कायम ठेवून तेथे सुद्धा आपल्या घराण्याचे नांव उज्ज्वल करते. आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या डॉ. सौ. सौदामिनी सुनील भिडे, पूर्वाश्रमीच्या गोडबोले, या एम. डी. (गायनॅकॉलॉजी) असूनसुद्धा फेब्रुवारी २०११ मध्ये सी. ए. ची परिक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाल्या. दोन विभिन्न क्षेत्रात आणि उच्च पदवी मिळविणारी आपली सून आहे हे डॉ. सौदामिनीचे सासरे बडोद्याचे श्री. सुरेश भिडे अभिमानाने सांगतात.

डॉ. सौदामिनी यांनी गुजरात एस्. एस्. सी बोर्डाच्या परिक्षेत ४२ हजार विद्यार्थ्यांमधून १७ वा क्रमांक आणि ॲलेंबिक शाळेत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांनी बडोद्याच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. एम्. डी. गायनॅक. (प्रसूतिशास्त्रतज्ञ) झाल्यानंतर बडोद्यामध्ये काही वर्षे नोकरी करून 'मस्कत' (सौदी अरेबिया) येथे गायनॅकॉलॉजिस्ट म्हणून खसब या ठिकाणी सरकारी इस्पितळात रुजू झाल्या. बडोद्यातील प्राध्यापक श्री. गोडबोले यांच्या सुसंकृत घरातील वारसा घेऊन सौदामिनी यांनी जीवनात यश व आनंदाची प्रेरणा निर्माण केली. मस्कत येथे नोकरी मिळाल्यानंतर आपल्या एक वर्षाच्या मुलास यजमान आणि सासू-सासरे यांच्या जवळ विश्वासाने ठेऊन नोकरीवर रुजू झाल्या. ७ ते ८ वर्षे मस्कत येथे नोकरी केल्यानंतर यजमान डॉ. सुनील यांचे बरोबर इंग्लंडला स्थायी झाल्या. त्या ठिकाणी मुलांचे शिक्षण व त्या बरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी त्यांनी समर्थपणे सांभाळली. जी मंडळी परप्रांतात अथवा परदेशात जावून मेहनत व बुद्धीचातुर्याने आपले बस्तान बसवितात एवढेच नव्हेतर त्याबरोबर धन, कीर्ती व नावलौकिकही मिळवितात अशा लोकांना सतत उच्च ध्येय गाठण्याचा ध्यास असतो कारण तेवढ्यावरच ते समाधानी नसतात. डॉ. सौ. सौदामिनी सुद्धा स्वस्थ न बसता फेब्रुवारी २०११ मध्ये कॉमर्सची कोणतीही पार्श्वभूमी नसतांना सर्व अभ्यास पुस्तकांच्या माध्यमातून करून सी. ए. ची परिक्षा पहिल्याच प्रयत्नात पास झाल्या. म्हणजे एम.डी. आणि सी. ए. या दोन्ही पदव्या भिन्न क्षेत्रातील असूनसुद्धा त्यांनी मिळविल्या आहेत ही बाब विशेष प्रशंसनीय आहे. याबद्दल नित्युंदन गोत्रीय भिडे कुटुंबीयांना सार्थ अभिमान वाटतो. आता फक्त सुरेश भिडे परिवाराची सून म्हणून नव्हे तर सासुरवाशिणीच्या रूपाने समस्त भिडे कुटुंबाची आपली सून म्हणून कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. सध्या डॉ. सौदामिनी यू. के. मधील डार्टफोर्ड मधील एच्. एस्. बी. सी. बँकेत मोठ्या हुद्यावर कार्यरत आहेत. त्यांचे बरोबर त्यांचे यजमान डॉ. सुनील हे एम्. डी. असून बालरोग तज्ञ म्हणून त्याच शहरात कार्यरत आहेत. या उभयतांना पुत्र ईशान आणि कन्या सोनाली ही अभ्यासात प्रथम श्रेणी कायम राखणारी दोन रत्ने आहेत. संसार व नोकरी सांभाळत नावलौकिक मिळविणे अशी तारेवरची कसरत करणे सर्वांनाच शक्य होते असे नाही. जीवन हे ज्ञान, विचार आणि कृती यांचे घनफळ आहे याचे डॉ. सौदामिनी हे उत्तम उदाहरण आहे.

*शब्दांकन - दिलीप भिडे (पुणे)* ❖


## पेशवाई निर्जलीकृत कांदा पूड (Dehydrated Onion Powder)

*पेशवाई निर्जलीकृत कांदा, कांदाकाप, कांदाकाचरी व कांदापूड या स्वरूपात सादर करीत आहोत.*

*पेशवाई हे जय गृह उद्योग, सांगली यांचे व्यापारी चिन्ह (ब्रँड नेम) आहे.*

*उत्तम दर्जाच्या निवडक वाळलेल्या कांद्यावर प्रक्रिया करून निर्जलीकृत कांदा तयार केला आहे. निर्जलीकरणाची खास प्रक्रिया व संयंत्र जय गृह उद्योग, सांगली यांनीच विकसित केले आहे.*

*निर्जलीकृत कांदा, काप, काचरी किंवा बांगडीच्या (कड्याच्या) आकारात तयार होतो. बांगडीचे आकारातील कांदा अर्धगोल अगर त्यापेक्षा लहान आकारात सुद्धा असेल. कांदा-काप अगर काचरी किंवा कीस या स्वरूपात एकत्र मिसळून अगर स्वतंत्रपणे उपलब्ध आहे. बहुधा तो मिश्र स्वरूपातच असतो.*

*कांद्यामध्ये साखर भरपूर असते म्हणून निर्जलीकृत कांदा नुसता खाण्यास गोड लागतो. त्यास स्वाद व रुची असते. निर्जलीकृत कांदा तळून अगर नुसता चिवड्यात मिसळता येतो. मसालेभात-पुलाव-बिर्याणी यावर नारळाचा कीस, चिरलेली कोथिंबीर याचे बरोबर निर्जलीकृत कांदा भुरभुरून या पदार्थाची चव-रुची वाढविता येते. मसालेभात-पुलाव-बिर्याणी यांची (डिश) सजविण्यासाठी निर्जलीकृत कांदा कीस उत्तम.*

*निर्जलीकृत कांदा चकती अगर कीस पाण्यात चिमुटभर मीठ घालून ४ तास बुडवून ठेवावा. किंवा चिमुटभर मीठ घातलेल्या उकळत्या पाण्यात (गॅस बंद करून) बुडवून ठेवावा. या कांद्यास ताज्या चिरलेल्या कांद्याची चव-वास-स्वाद-रुची मिळते. कांद्यातील पाणी निथळून काढून ओला कांदा वापरता येतो.*

*निर्जलीकृत कांद्यापासून कांदा पूड करता येते. स्वयंपाकात जेथे-जेथे आपण कांदा वापरतो त्या प्रत्येक ठिकाणी कांदा पूड वापरता येते. बरेच लोक कांदा खात नाहीत त्यामुळे दोन स्वतंत्र तोंडीलावणी करावी लागतात. आता हा त्रास वाचेल. कांदा न वापरता एकच तोंडीलावणे करा. कांदा न खाणाऱ्या पुरते तोंडी लावणे बाजूला काढा व उरलेल्या तोंडीलावण्यात कांदापूड घालून उकळी आणा. दोन वेगळी तोंडीलावणी तयार. दुपारच्या उरलेल्या तोंडीलावण्यास रात्री कांदा पूड घालून उकळा रात्रीचे जेवणास नवीन स्वाद-रुची व चवीचे तोंडीलावणे तयार. पंजाबी ग्रेव्हीच्या स्वयंपाकात पेशवाई 'कांदा पूड'' जरूर वापरा.*

*निर्जलीकृत पेशवाई कांदा कीस अगर पेशवाई कांदा पूड वापरून ओले खोबरे व हिरवी मिरची यांची ओली चटणी करता येते. हिरव्या मिरची ऐवजी पेशवाई हिरवी मिरची पूडही वापरता येईल. शिवाय पेशवाई पुदीना पूड व पेशवाई कढिपत्ता पूड यांचाही वापर करता येईल.*

*''कांदा पूड'' बाष्प शोषक (Hygroscopic) आहे. पिशवी फोडल्यावर ती घट्ट झाकणाच्या हवाबंद (Air Tight) डब्यात ठेवावी. कांदा पूड मध्ये गुठळ्या न करणारे संयुग (Anti Caking Agent) वापरलेले आहे.*

*पेशवाई निर्जलीकत कांदा व कांदापूड ही भारतीय मानक संस्था (Bureau of Indian Standards) यांच्या मानका प्रमाणे तयार करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.*

*खास चवीचे पेशवाई मसालेभात मसाला, पुलाव मसाला, बिर्याणी मसाला व शाही मसालेभात मसाला असे मसाले उपलब्ध आहेतच.*

*भारती बझार पुणे व सांगली येथे सर्व पेशवाई उत्पादने उपलब्ध आहेत.*

अधिक माहितीसाठी संपर्क साधा -

पेशवाई

जयश्री संजय भिडे. प्रोप्रा. जय गृह उद्योग,
१११११/१ उत्तर शिवाजी नगर, कै. विष्णू विनायक भिडे मार्ग,सांगली - ४१६४१६.
फोन : ०२३३-२३२१०१८/९९२१२४७३६२/९२०९२३७९५७. e-mail-peshwaimasale@gmail.com

**कु. मानसी सुहासचंद्र भिडे, पुणे हिला नुकताच महाराष्ट्र शासनाचा ''श्री शिवछत्रपती पुरस्कार '' प्राप्त झाला म्हणून नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे वतीने कार्याध्यक्ष श्री. शशिकुमारजी, दिलीप, माधव, विनायक, कर्नल सुनील भिडे यांनी तिच्या घरी जाऊन तिचा पुष्पगुच्छ व पेढे देऊन सत्कार केला. त्यावेळेस तिने व्यक्त केलेले मनोगत . . .**

# शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या सुवर्णकन्येचे मनोगत



२००८-०९ चा महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मला मिळाल्याचे समजले त्यावेळेस खूप आनंद झाला आणि स्केटिंगच्या खेळासाठी जे कष्ट घेतले त्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले. गेल्या ५ वर्षात भारततर्फे केलेला राष्ट्रीय उच्चांक, सुवर्ण पदके या मुळे २०१० मध्ये नामांकना नंतर हा पुरस्कार मला मिळेल याबद्दल मला खात्री वाटत होती. हा पुरस्कार मिळण्यामागे माझे कष्ट, मेहनत व जिद्द तर आहेच, या शिवाय माझी आई डॉ. गीता आणि माझे आजोबा श्री. सुधाकर कोकीळ यांनी माझ्या यशापयशाच्या वेळेस दिलेल्या मानसिक आधाराची शिदोरी महत्त्वपूर्ण ठरते. तसेच माझे वडील श्री सुहासचंद्र यांनी मानसिक आधारा बरोबरच खेळासाठी आर्थिक बळही पुरविले. माझे गुरू श्री अशोकराव गुंजाळ यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन, चॅम्पियन स्केटिंग क्लब, सिंबॉयसिस शाळा, फर्गसन् महाविद्यालय या सर्वांनी केलेली मदत व सहकार्य यामुळेच मी या पुरस्काराच्या यशापर्यंत पोहोचू शकले. अजून मला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत देशाचे नांव झळकवायचे आहे. त्याचबरोबर आईस स्केटिंग क्षेत्र सुद्धा खुणावत आहे.

दैदिप्यमान कामगिरीसाठी परिश्रम व मेहनतीबरोबरच यशाचे शिखर गाठण्याची जिद्द असली पाहिजे. प्रामाणिकपणे आपल्या ध्येयाकडे वाटचाल केल्यास यश व पुरस्कार आपल्यामागे आपोआपच चालत येतील. त्याकरिता कोणताही शॉर्टकट् न घेता चिकाटीने प्रयत्न करणे ही बाब भावी पिढीला नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

मला मनोगत व्यक्त करण्याची संधी 'आम्ही भिडे ' मधून मिळाली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते. आपल्या सर्वांचे आशिर्वाद आणि परमेश्वराचे पाठबळ सतत राहो हीच प्रार्थना !

*कु. मानसी सुहासचंद्र भिडे (पुणे)*

**मुंडाजे येथील अभूतपूर्व भिडे संमेलनाच्या फोटोग्राफ्स् आणि प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या डी. व्ही. डी. तयार झाल्या आहेत. ज्यांना हव्या असतील त्यांनी त्या जरूर विकत घ्याव्यात. फोटोग्राफ्स् (रु. ५०/-), प्रत्यक्ष चित्रीकरण (रु. १००/-) संपर्क : श्री. दिलीप भिडे ९६५७५४१२३६, विनायक भिडे : ९५५२२१६९६७**

## दखल

डॉ. अरविंद चाफेकर, गदग (कर्नाटक) यांनी 'आम्ही भिडे ' अंक ७ मधील सौ. वृषाली भिडे यांच्या बद्दल 'एक गुणवंत महिला ' हा लेख आणि कै. जी. एन्. भिडे मुंडाजे यांचे जन्मशताब्दी वरील लेख वाचून श्री. दिलीप भिडे यांचेकडे अभिप्राय कळविला आहे. त्याचप्रमाणे कै. जी. एन्. भिडे यांच्यावरील संपूर्ण लेख कन्नडमध्ये अनुवादित करून समर्थ संदेश (जून २०११) मासिकात पुन:प्रसारित करण्यात आला. ही बाब प्रशंसनीय आहे. वाचक समर्थ रामदास वाङ्मयाचे उपासक असून कर्नाटक मधील मराठी वाङ्मय प्रेमी मंडळाचे केंद्रचालक आहेत.

**दामोदर केशव भिडे, डोंबिवली**
**संपादक(अंक ७)**

**आम्ही भिडे अंक जाहिरात दरपत्रक**

आपण करीत असलेल्या उद्योग व्यवसायाची माहिती सुमारे १८०० कुटुंबांपर्यंत पोहोचवावी तसेच आम्हाला आपणाकडून मिळणाऱ्या जाहिरातीद्वारे आर्थिक सहकार्यही लाभेल.

**पानाचा आकार व जाहिरातीचा दर**

१) पूर्ण पान (१९० मिमी. रुंदी) x (२०० मिमी उंची) रु. २०००/-
२) अर्धे पान (१९० मिमी. रुंदी) x (१०० मिमी उंची)रु.१०००/-
३) पाव पान (९२.५मिमी रुंदी) x (१०० मिमी. उंची) रु. ५००/-
४) शुभेच्छापट्टि (१९० मिमी रुंदी) x (३० मिमी उंची)रु. ३००/-

सूचना :- चेक/ड्राफ्ट ''नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान'' या नावाने असावा.
(मो.नं. ९७६३७२७६८८, ९९३०५०८५०६)